# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सांगली

जिल्हा परिषद, नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, सांगली-४१६४१६.

कार्यालय दुरध्वनी क्र.(०२३३)२३७५३१८. Email - sanglidrda1@gmail.com.


महाराष्ट्र शासन

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

ग्रामविकास व जलसंधारण विभाग,महाराष्ट्र राज्य

## जाहिरात नमुना

**स्वयंसहाय्यता बचत गटांचे अभिलेखे छपाई बाबत इच्छुक पुरवठादारांकडून अर्ज मागविण्याबाबत.**

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाकडून ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान सुरु केले आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी जिल्हास्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे मार्फत करण्यात येते. सांगली जिल्हयातील *Non - Intensive* दहा तालूक्यातील ७६० स्वयंसहाय्यता बचत गटांचे लेखे छपाई करीता प्रिटींग व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींकडून मर्यादीत निविदा *( Limited Tender)* प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येणार आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रिटींग व्यवसाय करणाऱ्यांकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

- ***DSC (Digital Signature Certificate)***
- ***https://mahatenders.gov.in*.** या संकेत स्थळावर / पोर्टलवर नोंदणीकृत असावा.
- मागील तीन वर्षांची सरासरी उलाढाल र.रु. ७.०० लाखापेक्षा जास्त असलेबाबतचे ***Charted Accountant*** यांचे प्रमाणपत्र.
- ***Shop & Establishment Act*** अंतर्गत नोदणीकृत किंवा इतर सक्षम अधिकारी यांनी सदर व्यवसायासाठी नोदणीकृत केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- ***PAN*** कार्ड असावे.
- ***VAT*** नोंदणी प्रमाणपत्र
- सन २०१५-१६ वर्षाचे व्यवसाय कर भरलेचे चलन

वरील अटींची पुर्तंता करणाऱ्या इच्छुक पुरवठादारांनी त्यांची ***https://mahatenders.gov.in*.** वर नोंदणीकृत केलेला ***Login ID*** तसेच वर नमुद केलेल्या कागदपत्रासह वरील पत्यावर किंवा ***sanglidrda1@gmail.com***. च्या ई-मेलवर दिनांक २३/१२/२०१६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत अर्ज करणेत यावा. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा सदर मर्यादीत-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेता येणार नाही याची कृपया नोंद घेणेत यावी. सदर मर्यादीत निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक प्रिंटींग व्यवसाय करणाऱ्यांकडून कोणतीही निविदा शुल्क व ***EMD*** रक्कम घेण्यात येणार नाही. अर्ज सादर करणेच्या मुदतीत किंवा इतरबाबींमध्ये काही बदल झाल्यास त्याबाबत सूचना ***https://www.umed.in***. किंवा ***https://www.zpsangli.in***. या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. मर्यादीत निवीदा निवडने व अंतिम करणेचा अधिकार मा.चेअरमन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांचे राहील.

**प्रकल्प संचालक**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**
**सांगली**

G:\joshi.docx